ICE 'n' SPICE
व्हेज रेस्टॉरन्ट
पंजाबी डिशेस् । पावभाजी । चाईनीज । ज्युसेस् । आईस्क्रीम
गोदावरी कॉम्प्लेक्स,व्ही.आय.पी.रोड,नांदेड
मो. 9422172572, 9850430189

सायं दैनिक
# नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

• वर्ष २५ वे • अंक १४ • शनिवार दि.३ ऑक्टोंबर २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ • पाने ४ • किंमत १ रु.

## नांदेड व हिंगोली जिल्ह्याला भूकंपाचे दोन सौम्य धक्के

### भूकंपाची ३.३ आणि ४.५ रिश्टर स्केलची नोंद

नांदेड/प्रतिनिधी-हिंगोली आणि नांदेड या लगतच्या दोन्ही जिल्ह्यांमध्ये आज सकाळी भूकंपाचे जोरदार दोन धक्के जाणवले आहेत. अचानक काही सेकंद जमीन हादरल्याने नागरिकांमध्ये तीव्र घबराट पसरली. सकाळी ७.४६ मिनिटांनी पहिला भूकंपाचा धक्का जाणवला. त्यानंतर ९ वाजून ४३ मिनिटांनी भूकंपाचा दुसरा धक्का जाणवला. अचानक जमीन हादरल्यामुळे भीतीपोटी अनेक भागांतील नागरिक घराबाहेर पडले.

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागाने दिलेल्या अधिकृत माहितीनुसार, या भूकंपाची तीव्रता ३.३ तर दुसऱ्या भूकंपाच्या धक्क्याची तीव्रता रिश्टर स्केलवर ४.५ इतकी नोंदवली गेली आहे. या भूकंपाचा केंद्रबिंदू हिंगोली जिल्ह्यातील 'पांगरा शिंदे' हे गाव असल्याचे स्पष्ट झाले आहे. केंद्रबिंदू हिंगोलीत असला तरी त्याची तीव्रता जास्त असल्याने त्याचा परिणाम शेजारील नांदेड जिल्ह्यावरही मोठ्या प्रमाणावर दिसून आला. हिंगोली जिल्ह्यातील बहुतांश भागासोबतच नांदेड शहरासह जिल्ह्यात अनेक ठिकाणी भूकंपाचे तीव्र हादरे बसले. सकाळी कामाची वेळ असतानाच अचानक हा धक्का बसल्याने नागरिकांची मोठी धावपळ झाली. सुदैवाने, या भूकंपामुळे कोणतीही जीवित अथवा वित्तहानी झाल्याचं वृत्त नाही, अशी प्राथमिक माहिती जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आली आहे. नांदेड व हिंगोली जिल्ह्यात गेल्या काही




काळापासून सातत्याने भूगर्भातून आवाज येणे आणि सौम्य ते मध्यम स्वरूपाचे भूकंपाचे धक्के बसण्याचे सत्र सुरू आहे. आज बसलेला ४.५ रिश्टर स्केलचा धक्का तुलनेने मोठा मानला जात आहे. भूकंपाचे धक्के जाणवल्यास पान ४ वर

## पिके जळाली,विहिरींनी तळ गाठला;प्रशासन थेट बांधावर



### दुष्काळी स्थितीची सहाय्यक जिल्हाधिकाऱ्यांकडून पाहणी

माहूर/प्रतिनिधी-माहूर तालुक्यात तब्बल ५० दिवसांपेक्षा अधिक काळ पावसाने दडी मारल्याने दुष्काळाची तीव्रता दिवसेंदिवस वाढत आहे. पावसाअभावी खरीप पिके करपून गेली असून विहिरी आणि कूपनलिकांनीही तळ गाठला आहे. या गंभीर परिस्थितीची दखल घेत सहाय्यक जिल्हाधिकारी बी. सरवनन आणि तहसीलदार अभिजित जगताप यांनी २ ऑक्टोबर रोजी वाई बाजार व वानोळा गटातील बाधित शेतांची थेट बांधावर जाऊन संयुक्त पाहणी केली.

वाई बाजार व वानोळा परिसरातील विविध गावांमध्ये महसूल आणि कृषी विभागाच्या संयुक्त पथकाने शेतशिवारात जाऊन पिकांच्या नुकसानीची प्रत्यक्ष पाहणी केली. कापूस, सोयाबीन आणि तूर या प्रमुख खरीप पिकांना पाण्याअभावी मोठा फटका बसला असून अनेक ठिकाणी उभी पिके पूर्णपणे वाळल्याचे चित्र पाहायला मिळाले. पिकांसाठी केलेला भांडवली खर्च, बियाणे, खते आणि मशागतीवरील खर्च वाया गेल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. पाहणी दरम्यान शेतकऱ्यांनी प्रशासनासमोर आपल्या व्यथा मांडल्या. पावसाने पूर्णपणे पाठ फिरवल्यामुळे पिके हातची गेली असून आता जनावरांच्या चाऱ्यासोबतच पिण्याच्या पाण्याचाही प्रश्न गंभीर बनत असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले. त्यामुळे शासनाने तातडीने आर्थिक मदत आणि दुष्काळग्रस्त सवलती जाहीर कराव्यात, अशी मागणी त्यांनी केली. पान ४ वर

## टीम इंडियाने पाकिस्तानचा उडवला धुव्वा सलग दुसऱ्यांदा पटकावलं सुवर्णपदक




नवी दिल्ली:भारत विरुद्ध पाकिस्तान यांच्यात एशियन गेम्स २०२६ चा सुवर्णपदकासाठीचा फायनल सामना पार पडला. या सामन्यात भारताने १९ धावांनी पाकिस्तानवर विजय मिळवला आणि सुवर्णपदकावर पुन्हा एकदा नाव कोरलं. यापूर्वी भारताने २०२२ एशियन गेम्समध्ये सुद्धा सुवर्णपदकाची कमाई केलेली. तर यावेळी श्रेयस अय्यरच्या नेतृत्वात फायनल सामना खेळून भारताने सुवर्णपदक राखलं.

भारताकडून अभिषेक शर्मा (६१) आणि तिलक वर्मा (५१) यांनी अर्धशतकीय धावांची खेळी केली. तर गोलंदाजांमध्ये शिवम दुबे, अक्षर पटेल, वॉशिंग्टन सुंदर या तिघांनी प्रत्येकी ६ विकेट काढून पाकिस्तानला बॅकफूटवर ठेवलं. सुवर्णपदकाच्या लढतीपूर्वी भारतीय संघाचा कर्णधार श्रेयस अय्यरने टॉस जिंकून प्रथम फलंदाजी निवडली. यासह पाकिस्तानला प्रथम गोलंदाजीचे आव्हान मिळाले. भारताकडून फलंदाजीला वैभव सूर्यवंशी आणि अभिषेक शर्माची जोडी उतरली. मात्र यावेळी टीम इंडियाची सुरुवात मात्र खराब झाली. वैभव सूर्यवंशी आणि संजू सॅमसनने स्वस्तात विकेट गमावली, मात्र अभिषेक शर्माने तुफान फलंदाजी सुरु ठेवत भारताची बाजू लावून धरली. त्यानंतर श्रेयस अय्यर, ईशान किशन यांची सुद्धा चांगली साथ त्यांना लाभली. पुढे तिलक वर्माने ५१ धावांची नाबाद खेळी केली. भारतीय फलंदाजांनी ६ विकेट गमावून २११ धावांचा स्कोअर उभा केला. तर विजयासाठी पाकिस्तानला २१२ धावांचं आव्हान मिळालं होतं.

## रामतीर्थ प्रा.आ.केंद्रात परिचर वगळता कर्मचारी गैरहजर!

### सीईओ महेश पाटील यांच्या अचानक पाहणीत प्रकार उघड

नांदेड/प्रतिनिधी-जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक महेश पाटील यांनी २ ऑक्टोबर रोजी बिलोली तालुक्यातील रामतीर्थ प्राथमिक आरोग्य केंद्राला अचानक भेट दिली. यावेळी परिचर वगळता इतर कर्मचारी केंद्रात उपस्थित नसल्याचे निदर्शनास आले.

उपस्थिती मस्टर तपासला असता काही कर्मचाऱ्यांनी स्वाक्षऱ्या केलेल्या असतानाही ते प्रत्यक्षात केंद्रात उपस्थित



नसल्याचे आढळले. तर काही कर्मचाऱ्यांनी मस्टरवर स्वाक्षरी केलेली नव्हती. दोन्ही बाबतीत अनुपस्थितीबाबत रजेचे अर्ज उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले.दरम्यान पाहणीची माहिती मिळाल्यानंतर वैद्यकीय अधिकारी डॉ. विवेक बोरसे काही वेळाने केंद्रात उपस्थित झाले. या प्रकाराची मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांनी गंभीर दखल घेतली असून, कर्तव्यावर गैरहजर आढळलेल्या कर्मचाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या पाहणीदरम्यान अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी परीक्षित यादव उपस्थित होते.

## क्षुल्लक वादातून मित्राचा खून;आरोपीस अटक

नांदेड/प्रतिनिधी-क्षुल्लक कारणावरुन मित्राचा खून करुन प्रेत एका खोलीत लपवून ठेवणाऱ्या आरोपीस पोलीसांनी काही तासातच अटक केली आहे.

या घटनेबाबत पोलीसांनी दिलेली माहिती अशी की, सनी अजेबसिंघ मसिह (वय ३६) रा.इसानगर, बटाला जि.गुरदासपूर, पंजाब व दारासिंघ गुरुनामसिंघ हे दोघेजण विष्णुपुरी शिवारात एका खोलीत भाड्याने राहत होते. सनी मसिह याने दारासिंघ याची छऱ्याची बंदुक हिसकावून घेतली. ती बंदुक दारासिंघ याने अनेकवेळा मागितल्यानंतरही परत दिली नाही. दि.२९ सप्टेंबर रोजी रात्री १० वाजण्याच्या सुमारास सनी मसिह व दारासिंघ यांच्यात वाद झाला. दारासिंघ याने सनी याच्या डोक्यावर व तोंडावर दगडाने गंभीर वार करुन त्याचा जागीच खून केला. मृतदेह खोलीत लपवून बाहेरुन कुलूप लावून तो निघून गेला. खोलीतून दुर्गंधी येत असल्याची माहिती शुक्रवार दि.२ ऑक्टोबर रोजी नांदेड ग्रामीण पोलीसांना नागरिकांनी दिली. घटनास्थळी पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर व पोलीस अधिकारी, कर्मचारी दाखल झाले. पोलीसांनी पंचासमक्ष बंद खोलीचे कुलूप तोडून आतमध्ये प्रवेश केला. खोलीत सडलेल्या अवस्थेत मृतदेह आढळून आला. पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा करुन प्रेत शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आले. या प्रकरणी सुरज शास्त्री यांच्या तक्रारीवरुन नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस अधीक्षक डॉ.नीलाभ रोहन, इतवारा विभागाचे पोलीस उपअधीक्षक प्रशांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीसांनी आरोपीचा शोध सुरु केला. आरोपी हा पंजाबमधील असल्याने तो पळून जाण्याच्या तयारीत असतांना पोलीसांनी काही तासातच दारासिंघ गुरुनामसिंघ यास अटक केली आहे.

## वीज वितरण कंपनीच्या गलथान कारभारावर ग्रामस्थ आक्रमक

### शिरपूर ग्रामपंचायतीच्या बैठकीत तेलंगणात जाण्याचा ठराव मंजूर

**वैशपाल कांबळे**

मांडवी/प्रतिनिधी-वादळी वाऱ्यामुळे जळालेले रोहित्र (ट्रान्सफॉर्मर) बदलून न दिल्यामुळे गेल्या अनेक दिवसांपासून अंधारात चाचपडणाऱ्या शिरपूर (ता. किनवट) येथील ग्रामस्थांच्या संयमाचा अखेर बांध फुटला आहे. वीज महावितरणच्या या उदासीन धोरणाचा तीव्र निषेध नोंदवत शिरपूर ग्रामपंचायतीने आयोजित मासिक सभेत थेट आमचे गाव शेजारील तेलंगणा राज्यात समाविष्ट करा असा खळबळजनक ठराव आज (शनिवार) दि.३ ऑक्टोबर रोजी झालेल्या मासिक बैठकीत बहुमताने संमत केला आहे. महावितरणच्या मनमानी कारभारामुळे सीमावर्ती भागात प्रशासनाविरोधात मोठा रोष निर्माण झाला आहे.

२० सप्टेंबर रोजी झालेल्या भीषण विजेच्या कडकडाटासह पाऊस पडला. वादळी वाऱ्यामुळे पेसा क्षेत्रांतर्गत येणाऱ्या शिरपूर गावातील तब्बल तीन रोहित्र जळून खाक झाली. यामुळे संपूर्ण गावाचा वीजपुरवठा पूर्णपणे खंडित झाला आहे. नवीन रोहित्र बसवण्यासाठी ग्रामस्थ व लोकप्रतिनिधींनी महावितरणच्या अधिकाऱ्यांकडे वारंवार हेलपाटे मारले. मात्र अधिकाऱ्यांच्या कानपिचक्या अन दुर्लक्षामुळे आजतागायत गावात वीज पोहोचू शकलेली नाही. विजेअभावी गावातील जनजीवन पार विस्कळीत झाले असून त्याचे गंभीर परिणाम समोर येत आहेत. विजे अभावी शेतीचे सिंचन पूर्णपणे ठप्प झाले असून, हातातोंडाशी आलेली उभी पिके डोळ्यांदेखत वाळू लागली आहेत.

**नागरी सुविधा कोलमडल्या**

गावातील सार्वजनिक पाणीपुरवठा योजना बंद पडल्याने महिलांना पाण्यासाठी पायपीट करावी लागत आहे. तसेच पिठाच्या गिरण्या व इतर दैनंदिन इलेक्ट्रिक उपकरणे बंद असल्याने नागरिक हैराण झाले आहेत. महाराष्ट्राच्या सीमेवर असलेल्या या भागात सातत्याने प्रशासकीय दुर्लक्ष होत असल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली. सीमापार तेलंगणा राज्यात २४ तास वीज, चांगल्या नागरी सुविधा आणि जलद प्रशासकीय कामे होतात; मग महाराष्ट्रातच सोयी-सुविधांसाठी एवढा संघर्ष का? असा संतप्त सवाल विचारत, प्रशासनाच्या या दुटप्पी धोरणाचा निषेध म्हणून ग्रामपंचायतीने थेट तेलंगणा राज्यात विलीन होण्याचा ठराव आज झालेल्या मासिक बैठकीत मंजूर केला आहे.

**...तर ग्रामस्थांचे उग्र आंदोलन-सीताराम गेडाम**

गावातील तिन्ही रोहित्र तातडीने बसवून वीजपुरवठा पूर्ववत केला नाही,तर ग्रामस्थ रस्त्यावर उतरून उग्र आंदोलन छेडतील. प्रशासनाने आमच्या संयमाची अजून परीक्षा घेऊ नये.असा इशारा सरपंच



सीताराम गेडाम व उपसरपंच गजानन भुरे यांनी किनवट गटविकास अधिकाऱ्यांना निवेदनाद्वारे दिला आहे.

# मतदाराच्या विश्वासाशी खेळ थांबवा!

**लोकशाहीची सर्वात मोठी ताकद संसदेत नाही, सत्तेच्या खुर्चीत नाही आणि कोणत्याही राजकीय पक्षाच्या झेंड्यातही नाही. तिची खरी ताकद आहे ती सामान्य मतदाराच्या बोटावर लागलेल्या शाईत! त्या एका शाईच्या थेंबातून सत्ता निर्माण होते, सरकारे बदलतात आणि सत्ताधाऱ्यांना जनादेश मिळतो. म्हणूनच त्या मतावर, त्या मतदारावर आणि त्या मतदारयादीवर जर संशयाची सावली पडत असेल, तर हा प्रश्न केवळ विरोधकांचा किंवा सत्ताधाऱ्यांचा राहत नाही; तो भारतीय लोकशाहीच्या अस्तित्वाचा प्रश्न बनतो. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या कार्यपद्धतीवरून देशात निर्माण झालेला वाद याच कारणामुळे गंभीर आहे. मतदारयादीतील बदल, विशेष सघन पुनरावलोकन अर्थात एसआयआर, मतदारांची नावे वगळण्याची प्रक्रिया आणि निवडणूक आयोगाच्या अंतर्गत निर्णय प्रक्रियेबाबत अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहेत. 'इंडियन एक्स्प्रेस'ने आयोगातील अंतर्गत मतभेदांबाबत वृत्त दिल्यानंतर या प्रश्नांना आणखी धार आली. दुसरीकडे, निवडणूक आयोगाने निर्णय सर्वानुमते होत असल्याचे स्पष्ट केले आहे. मग प्रश्न सरळ आहे, जर कारभार पारदर्शक आणि निर्दोष असेल, तर प्रत्येक शंकेचे उत्तर कागदपत्रांसह जनतेसमोर ठेवण्यास अडचण काय? आज गांधी जयंतीच्या दिवशी मुंबईतील शिवाजी पार्कवर सीजेपीने ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी करत आंदोलन केले. या आंदोलनात मोठ्या संख्येने नागरिक सहभागी झाले. दिल्लीतही निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीविरोधात आंदोलन करण्यात आले आणि पोलिसांनी अनेक आंदोलकांना ताब्यात घेतले. या आंदोलनातील प्रत्येक आरोप तथ्य म्हणून स्वीकारणे योग्य नाही. पण प्रत्येक प्रश्नाला 'राजकीय कट' म्हणून फेटाळणे त्याहून धोकादायक आहे. कारण लोकशाहीत प्रश्न विचारणारा शत्रू नसतो. प्रश्नांना उत्तर न देणारी व्यवस्था मात्र संशयाला आमंत्रण देते.आता विषय व्यक्तीपुरता मर्यादित ठेवून चालणार नाही. ज्ञानेश कुमार यांचा राजीनामा द्यावा की नाही, हा राजकीय आणि घटनात्मक प्रक्रियेचा विषय आहे; पण निवडणूक आयोगाने जनतेच्या विश्वासाला उत्तर कसे द्यायचे?, हा राष्ट्रीय प्रश्न आहे. मतदारयादीतून एखाद्या नागरिकाचे नाव वगळले तर त्याला त्याची माहिती कधी मिळते? त्याला आक्षेप घेण्याची संधी किती सहज उपलब्ध आहे? मतदारयादीतील बदलांचे ऑडिट कोण करणार? डिजिटल डेटाची सुरक्षितता कोण सुनिश्चित करणार? आयोगातील महत्त्वाच्या निर्णयांवर मतभेद असतील तर त्यांची नोंद जनतेसमोर का येऊ नये? या प्रश्नांना घोषणांनी उत्तर मिळणार नाही. दस्तऐवज द्या, प्रक्रिया उघडी करा, जबाबदारी निश्चित करा! आणि म्हणूनच इंडिया आघाडी, डावे पक्ष, विद्यार्थी संघटना आणि नागरी संघटनांनी पुढील काळात आंदोलनाचा मार्ग स्वीकारला तर त्याचा केंद्रबिंदू केवळ व्यक्तीविरोधी घोषणांवर न राहता मतदाराच्या अधिकारावर असला पाहिजे. आंदोलन देशाच्या विविध भागांत पोहोचणार असल्याचे सीजेपीने जाहीर केले आहे; दिल्लीतही पुढील आंदोलनांची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. या संघर्षात सरकारचीही परीक्षा आहे आणि विरोधकांचीही. सरकारने प्रत्येक प्रश्नाला विरोधकांचे षड्यंत्र म्हणून हिणवणे थांबवले पाहिजे. विरोधकांनीही प्रत्येक प्रशासकीय त्रुटीला निवडणूक गैरव्यवहाराचा अंतिम पुरावा ठरवण्याऐवजी ठोस पुरावे जनतेसमोर ठेवले पाहिजेत. आणि निवडणूक आयोगाने तर त्याहून एक पाऊल पुढे जाऊन स्वतःहून पारदर्शकता दाखवली पाहिजे. कारण निवडणूक आयोगाची प्रतिष्ठा सरकारच्या संरक्षणाने टिकत नाही; ती मतदाराच्या विश्वासाने टिकते.आज मुंबईच्या शिवाजी पार्कपासून दिल्लीच्या रस्त्यांपर्यंत उमटलेला आवाज उद्या शांत होईल. मोर्चे संपतील, घोषणा थांबतील, राजकीय नेते पुढच्या मुद्द्याकडे वळतील. पण मतदाराच्या मनात 'माझे नाव मतदारयादीत राहील का? माझे मत सुरक्षित आहे का? माझ्या मताची मोजदाद निष्पक्षपणे होईल का?' हा प्रश्न कायम राहिला, तर लोकशाहीच्या पायाभरणीत भेग पडेल.म्हणून निवडणूक आयोगाने मौन सोडले पाहिजे. सरकारने राजकीय बचावाऐवजी संस्थात्मक पारदर्शकतेचा मार्ग स्वीकारला पाहिजे. विरोधकांनी आंदोलनाबरोबर पुराव्यांची लढाई लढली पाहिजे.मतदाराच्या अधिकारावर कोणाचाही मालकी हक्क नाही. मतपेटीवर कोणाची सावली असता कामा नये. आणि निवडणूक आयोग हा सत्तेचा रखवालदार नसून मतदाराच्या विश्वासाचा पहारेकरी आहे, हे त्याला प्रत्येक क्षणी सिद्ध करावे लागेल. कारण शेवटी प्रश्न ज्ञानेश कुमार यांचा नाही. प्रश्न कोणत्या पक्षाचा विजय होईल याचाही नाही. प्रश्न आहे, भारताच्या मतदाराचा विश्वास जिवंत राहणार आहे की नाही? या प्रश्नाचे उत्तर घोषणांनी नव्हे, तर पारदर्शक कारभाराने द्यावे लागेल. आणि तोपर्यंत प्रश्न विचारले जातील, आंदोलन होतील आणि लोकशाही आपल्या हक्कासाठी रस्त्यावर उतरत राहील.**

# ज्ञान, चारित्र्य आणि राष्ट्रसेवा: स्वामी रामानंद तीर्थ यांचे शैक्षणिक विचार

प्रा.स्वाती हरिभाऊ काटे
समाजशास्त्र विभागप्रमुख
पीपल्स कॉलेज, नांदेड

भारत देशाच्या कल्याणासाठी जन्मलेले तेजस्वी रत्न म्हणजे स्वामी रामानंद तीर्थ. यशोदा व भवानराव यांच्या पोटी ३ ऑक्टोबर १९०३ रोजी कर्नाटकातील सिंदगी येथे व्यंकटेशचा जन्म झाला.आई-वडिलांच्या अध्यात्मिक साधनेचा ठसा बालपणीच व्यंकटेशच्या कोवळ्या मनावर उमटला. त्यांच्या शिक्षणाचा श्रीगणेशा सिंदगी या त्यांच्या जन्म गावीच झाला, पुढे गाणगापूर येथे त्यांचे प्राथमिक शिक्षण झाले.

**राष्ट्रभक्तीचे संस्कार**-सोलापूर येथील प्रख्यात नॉर्थ कोट हायस्कूलमध्ये व्यंकटेश यांनी प्रवेश घेतला. या शाळेत त्यांच्यावर राष्ट्रभक्तीचे संस्कार झाले आणि राष्ट्रप्रेमाची बीजे मनात निर्माण झाली. मुंबईत मेकॉनली थिएटरमध्ये तत्कालीन गव्हर्नर लॉर्ड वेलिंग्टन यांच्या भाषणामुळे ब्रिटिश साम्राज्याविषयीची चीड स्वामीजींच्या मनात निर्माण झाली. त्यांनी वस्तीगृहावर लावण्यात आलेला युनियन जॅक झेंडा मित्रांच्या मदतीने फेकून दिला. एकनाथ गोडबोले या मित्राची सोबत त्यांना शाळकरी वयात मिळाली. ही मैत्री निरपेक्ष जीवन जगण्यासाठी त्यांना मार्गदर्शक ठरली.



**कष्ट,अभ्यास आणि लेखन**-अंमळनेरच्या राष्ट्रीय महाविद्यालयांमध्ये पुढील शिक्षणासाठी व्यंकटेश रवाना झाले. वसतिगृहात राहण्यासाठी व दैनंदिन गरजा भागविण्यासाठी त्यांना भावाकडून दहा रुपये मिळत. ग्रंथालयामध्ये दररोज तीन तास काम करून ते महिन्याकाठी १५ रुपये मिळवत. अशा पद्धतीने स्वकष्टातून त्यांनी आपले महाविद्यालयीन शिक्षण सुरू केले. ते सकाळी साडेतीन वाजता उठत व रात्री उशिरापर्यंत अभ्यास करत. याच काळात त्यांनी मित्रांच्या सहकार्याने 'वेड्याचे प्रताप' हे सदर हस्तलिखित मासिकातून प्रकाशित केले. या मासिकात प्रामुख्याने आत्मानुभव लिहिले जात. वर्गमित्रांसमवेत केलेल्या अभ्यासाबाबतच्या चर्चा शैक्षणिक वाटचालीत महत्त्वाच्या ठरल्या. या महाविद्यालयाचे प्राचार्य जनार्दनपंत गुणे आध्यात्मिक वृत्तीचे व ब्रह्मचारी गृहस्थ होते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव व्यंकटेश यांच्यावर पडला.

**स्वदेशी व खादीचा पुरस्कार**-कर्तव्यनिष्ठा, शिस्तप्रियता हे गुण प्राचार्यांच्या व्यक्तिमत्वामधून व्यंकटेश यांनी आत्मसात केले.याच काळात त्यांनी स्वयंसेवक दल निर्माण केले. याठिकाणी देशभक्तीपर गीते, स्वयंशिस्त, नीतीमूल्यांची जपवणूक, चरख्यावरील सुत कताई इत्यादी बाबी नेटाने व शिस्तीने केल्या. साधारणतः हे काम एक तास चाले. खादीचा वापर करण्यावर त्यांनी या काळात भर दिला. 'यंग इंडिया' या महात्माजींच्या नियतकालिकाचे नियमित वाचन करणे ही चांगली सवय या काळात त्यांनी लावून घेतली. स्वदेशीचा वापर करण्याचा पुरस्कार करण्यासाठी त्यांनी व त्यांच्या मित्रांनी गिरणीवर तयार होणाऱ्या कापडाच्या ढिगास आग लावली. वस्तीगृहात काही कारणामुळे मतभेद झाले व त्यांना वसतिगृह सोडावे लागले, त्यानंतर दोन मैलांवर असणाऱ्या एका पडक्या घरात राहून, दोन रुपये महिना देऊन त्यांनी डाळ भाकरीवर आपली गुजरान केली. कुठलीही तक्रार न करता त्यांनी आपला प्रवास सुरू ठेवला.

**पुण्यातील वास्तव्य**-पुढील शिक्षणासाठी त्यांनी पुण्यातील टिळक महाविद्यालय गाठले. १९२५ मध्ये ते वाङ्मय विशारद पदवीधर झाले. पुढे दोन वर्षांचे फेलो म्हणून त्यांची निवड झाली व एम. ए. समकक्ष असलेली वाङ्मय पारंगत ही पदव्युत्तर पदवी 'लोकशाहीचा विकास' या विषयावर उत्कृष्ट निबंध लिहून त्यांनी मिळवली. पुणे येथे वास्तव्य असताना ना.म.जोशी यांच्याशी त्यांचा परिचय झाला. ना.म.जोशी हे कामगार चळवळीचे नेतृत्व करत होते आणि त्यांना एक सहाय्यक हवा होता. यासाठी त्यांनी 'भांडवल व श्रम' या विषयावर निबंध लिहून पाठवण्याचे आवाहन केले होते. व्यंकटेश यांनी या आवाहनास प्रतिसाद दिला व निबंध लिहिला. व्यंकटेश यांनी लिहिलेला निबंध न.म.जोशी यांना आवडला व त्यांची नोकरी निश्चित झाली.

**मुंबईतील कार्य**-अशाप्रकारे व्यंकटेश यांनी शिक्षणाचा उपयोग समाजासाठी करण्यास सुरुवात केली. टेक्स्टाईल लेबर युनियन या कामगार संघटनेत मुंबई शहराचे उपसंघटक म्हणून व्यंकटेश रुजू झाले.मुंबईतील वास्तव्यात व्यंकटेश यांनी कामगारांचे होणारे शोषण जवळून अनुभवले व त्यांच्या मनात चीड निर्माण झाली. सुप्रसिद्ध कामगार नेते एस. एच. झाबवाला यांच्याशी याच काळात व्यंकटेश यांचा संपर्क आला. त्यांनी सुरू केलेल्या 'कामगार' या साप्ताहिकाचे संपादनकार्य वेंकटेशजींनी आनंदाने स्वीकारले. सर्व्हंटस ऑफ इंडियन सोसायटी या संस्थेचे ते सदस्य झाले. एन. बी. सकलातवाला या कामगार नेत्यांबरोबर त्यांनी विविध कामगार सभांना उपस्थित राहण्यास सुरुवात केली.

**दिल्लीतील वार्तांकन**-ना.म.जोशी यांनी पुणे येथील 'ज्ञानप्रकाश' या वृत्तपत्राचे प्रवेशपत्र व्यंकटेशजी यांना मिळवून दिले, त्यामुळे दिल्ली येथील केंद्रीय विधिमंडळात उपस्थित राहून वार्तांकन करण्याची संधी या दिवसात व्यंकटेश यांना लाभली. याच काळात त्यांनी विविध दिग्गज नेत्यांची भाषणे ऐकली. हे नेते कसे काम करतात? ते प्रत्यक्ष जवळून अनुभवता आले. या नेतृत्वाची काम करण्याची शैली, समजून घेता आली. लाला लाजपतराय, मोतीलालजी नेहरू या नेत्यांबद्दल त्यांनी जाणून घेतले. याच काळात स्वामीजींना अर्धांगवायूचा झटका आला, आजारातून ते सहीसलामत बाहेर पडले.पण दगदग सहन होत नव्हती. ना.म.जोशींनी त्यामुळे त्यांना मुंबईच्या कामकाजाऐवजी सोलापूरच्या कामगार चळवळीचे कामकाज पाहण्यास नियुक्त केले. सोलापुरातील वास्तव्यादरम्यान व्यंकटेशजींचा हिप्परगा येथील शाळेचे संचालक अनंतराव कुलकर्णी यांच्याशी स्नेह जडला. कुलकर्णी यांनी व्यंकटेशजींना हिप्परगा येथील राष्ट्रीय शाळेची माहिती दिली. या शाळेचे मुख्याध्यापक म्हणून जबाबदारी घ्यावी असेही त्यांनी सुचवले. शाळा पाहून पुढील निर्णय घेईल असे व्यंकटेशजींनी अनंतराव कुलकर्णी यांना कळवले. शाळा आवडल्यानंतर आपल्या जीवनाच्या नव्या अध्यायाला वेंकटेशजी यांनी प्रारंभ केला. दि.९ जून १९२९ रोजी हिप्परगा शाळेचे मुख्याध्यापक म्हणून व्यंकटेश भवानराव खेडगीकर रुजू झाले. ते विद्यार्थ्यांमध्ये रमले. विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रप्रेम, नैतिकता, शिस्त, स्वावलंबन हे गुण रुजवण्यासाठी त्यांनी विविध प्रयोग केले. अभ्यासक्रमाच्या सोबत त्यांनी मूल्य शिक्षणाची रुजवात केली. हिप्परगा येथे असतानाच व्यंकटेशजी यांच्या मनात संन्यास दीक्षा घेण्याची इच्छा प्रबळ झाली, रामतीर्थ यांचे शिष्य असलेल्या नारायण स्वामी यांच्याकडून दि.१४ जानेवारी १९३२ रोजी हिप्परगा येथे त्यांनी संन्यासदिक्षा घेतली व व्यंकटेश भवानराव खेडगीकर यांना स्वामी रामानंद तीर्थ ही ओळख मिळाली.

## स्वामी रामानंद तीर्थ ही ओळख

शाळेच्या मान्यतेसाठी स्वामी रामानंद तीर्थ यांना खूप झगडावे लागले. त्यांची तळमळ, चिकाटी, काम करण्याची हातोटी हे पाहून सर हैदरी यांनी शाळेच्या मान्यतेचे लेखी अभयपत्र दिले. मुंबई येथील भेटीमध्ये १९३७ साली सय्यद अली अकबर यांनी शाळेची तपासणी केली. विद्यार्थ्यांची परीक्षा घेतली. जोशी यांनीदेखील शाळेला मान्यता मिळावी म्हणून स्वामीजींसोबत प्रयत्न केले, आणि या प्रयत्नांना यश लाभले. १९३८ मध्ये दहावीची पहिली बॅच हिप्परग्याच्या शाळेतून बाहेर पडली. हे यश शाळेच्या मान्यतेपुरते मर्यादित नव्हते तर निजामशाहीला टक्कर देण्यासंदर्भाने जनमानस निर्माण करण्यासाठी सुरू झालेला हा एक भरभक्कम आशावाद होता. पुढे याच शिक्षण संस्थेच्या माध्यमातून १९५६ साली संस्थेअंतर्गत योगेश्वरी विज्ञान महाविद्यालय उघडण्यात आले. हैदराबादचे राजा धनराजगिर एक गर्भ श्रीमंत व्यक्तिमत्व होते. त्यांना डेक्कनचा कुबेर समजले जाई. त्यांची स्वामी रामानंद तीर्थ यांच्यावर श्रद्धा होती, राजा धनराज गीर यांना हिप्परगा शाळेच्या दशकपूर्ती समारोहाच्या कार्यक्रमास आमंत्रित करण्यात आले.२२ जानेवारी १९३२ रोजी राजा धनराज गिरी यांनी स्वामीजींच्या स्वीकृत तत्व व कार्याविषयी गौरवोद्गार काढले होते, धनराज गिर यांच्या कन्या राजकुमारी इंदिरादेवी यांची मी मराठवाडा अमृत महोत्सवाच्या निमित्ताने भेट घेतली त्या अत्यंत शांत मायाळू आणि वडिलांबाबत, वडिलांनी निजाम काळात हैदराबाद येथे केलेल्या कार्याबाबत तसेच महिलांच्या संदर्भाने निजाम काळात झालेल्या विविध चळवळींबाबत विविधांगी चर्चा केली.

**अंबाजोगाईतील शैक्षणिक कार्य**-हिप्परगा येथील शाळेत काही वैचारिक मतभेद झाल्यामुळे स्वामी रामानंद तीर्थ यांनी आंबेजोगाई येथे योगेश्वरी शाळेमध्ये लक्ष घातले आंबेजोगाई या ठिकाणी एखादी शाळा सुरू करावी असे त्यांच्या मनात होते आंबेजोगाई येथील नारायणराव जोशी यांनी १९१८ मध्ये योगेश्वरी नूतन विद्यालय ची स्थापना केली होती. योगेश्वरी देवीच्या मंदिराजवळील हॉलमध्ये ही जागा भरत असे मार्च १९३५ मध्ये स्वामी रामानंद तीर्थ या ठिकाणी आले. ५ मे १९३५ रोजी अक्षय तृतीयेच्या दिवशी या शाळेत नव्याने आठवा वर्ग सुरू करण्यात आला. स्वामीजी योगेश्वरी नूतन विद्यालयाचे मुख्याध्यापक म्हणून काम करू लागले. जुलै १९३६ मध्ये त्यांनी नववीच्या वर्ग सुरू केला. राष्ट्रप्रेम, निजाम राजवटी विरोधी मानसिकता या मुळे तसेच शाळेमध्ये उर्दू भाषेत शिकवले जात नसल्यामुळे निजाम सरकार शाळेला मान्यता देत नव्हते. या शाळेच्या संदर्भाने स्वामीजी म्हणाली की आमची शाळा विद्यार्थ्यांना नवा विचार देईल पण कोणत्याही विचारांची सक्ती करणार नाही, माणसा-माणसामधील भिंती तोडून हृदयातला माणूस ओळखणे आमच्या शाळेतून शिकवले जाईल. स्वामी रामानंद तीर्थ यांच्या समवेत बाबासाहेब परांजपे यांनी जनतेला हा विचार पटवून दिला.

**स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व**-निजामाविरुद्ध लढा देण्यासाठी योग्य नेतृत्व हवे आहे या जाणिवेतून संस्थानातील राजकीय चळवळीचे नेतृत्व करण्यास स्वामी रामानंद तीर्थ योग्य व समर्थ आहेत त्यामुळे स्वामीजींनी राजकीय चळवळीचे नेतृत्व करावे अशी चर्चा सुरू झाली तेव्हा स्वामीजींनी योगेश्वरी शाळेच्या कार्यकारी मंडळाशी या संदर्भाने निर्णय घेण्यासाठीचा मनोदय बोलून दाखवला. सर्वांनीच स्वामीजींना राजकीय चळवळीत सक्रिय नेतृत्व करण्यासाठी प्रोत्साहन दिले. आणि स्वामी रामानंद तीर्थ महाराष्ट्र परिषदेच्या अस्थाई समितीचे चिटणीस झाले. मुख्याध्यापक पदाचा त्यांनी राजीनामा दिला आणि संस्थेचा निरोप घेऊन ०९ जून १९३८ रोजी हैदराबादकडे 'जिम्मेदारांना हुकूमत लेके रहेंगे' या जाणिवेतून कूच केली. निजामकालीन शिक्षण हे निजाम राजवटीला पोषक ठरणारे होते. त्यात प्रामुख्याने निजाम कायदा शिकवला जात असे. शिक्षणाची भाषा उर्दू होती. निजामी पद्धतीचा पोशाख विद्यार्थ्यांनी परिधान करणे अनिवार्य होते. पायघोळ झब्बा, डोक्यावर रुमी टोपी बंधनकारक असे. शिक्षण संस्था साधारणत: तीन विभागात विभागल्या गेल्या होत्या. पहिली ते चौथी प्राथमिक शाळा( मदरसे तह तानिया) पाचवी ते सातवी पूर्व माध्यमिक शाळा (मदरसे वस्तानिया)आणि माध्यमिक शाळा इयत्ता आठवी दहावी साठी असे ज्याला मदरसा फोकनिया म्हटले जाई. पुढे उस्मानिया विद्यापीठ स्थापन केले गेले. यातूनच पुढे छत्रपती संभाजीनगर येथे पहिले औद्योगिक शिक्षणाची शाळा १८८१ व शेतकी स्कूल १८९२ सुरू झाले. छत्रपती संभाजीनगर येथील मदरसा फोकणीयामध्ये उर्दू प्रमाणेच इंग्रजी माध्यमातून शिक्षण मिळत असे. उस्मानिया इंटरमिजिएट कॉलेज या शहरात सुरु झाले होते. लेखी परीक्षा विद्यार्थ्यांना पास होण्यासाठी अनिवार्य असल्या संदर्भातील कायदा हा इसवी सन १८७३ साली झाला होता. निजाम सत्तेला विरोध करण्यासाठी व राष्ट्र प्रेमाची भावना समाजात निर्माण करण्यासाठी मातृभाषेतून शिक्षण देणाऱ्या राष्ट्रीय शाळा मोठ्या प्रमाणात निर्माण होणे आवश्यक होते.निजाम राज्यात साधारणत: १९१६ ते १९४६ च्या दरम्यान परभणी, छत्रपती संभाजीनगर येथील सरस्वती भुवन, मराठा हायस्कूल, शारदा मंदिर, गुंजोटी येथील श्रीकृष्ण महाविद्यालय, चाकूर मधील शिक्षण संस्था,आंबेजोगाई येथील योगेश्वरी, उदगीर येथील शिक्षण संस्था, लातूर येथील ज्युबिली व राजस्थान या शैक्षणिक संस्थांनी राष्ट्रीय कार्याची मुहूर्तमेढ रोवली. परतूर येथे भरलेल्या पहिल्या महिला परिषदेच्या अध्यक्षा होण्याचा मान मिळालेल्या सुशिलाबाई दिवाण यांच्या मुलीने काढलेल्या खाजगी शाळेची खूप प्रशंसा त्या काळी झाली. निजाम सरकारला विरोध करण्यासाठी, मातृभाषेला प्राधान्य देण्यासाठी, आंध्र संघम, आर्य समाज इत्यादींनी शाळा, वाचनालय, स्वतंत्र अभ्यासक्रम सुरू करण्यास प्रारंभ केला. मराठवाड्यामध्ये या संदर्भाने प्रयत्न सुरू झाले होते. साधारणता २०-२१ शाळा त्या काळात सुरू झाल्या. विवेकवर्धिनी (हैदराबाद) तसेच गुलबर्गा येथे विठ्ठलराव देऊळगावकर यांनी विद्यालय स्थापन केले.

साधारणतः १९०६ मध्ये भारतीय स्वातंत्र्य चळवळीत राष्ट्रप्रेम, मातृभाषा, भारतीय संस्कृतीला महत्त्वाचे मानून राष्ट्रीय शिक्षणाची संकल्पना मांडली गेली. या धोरणाला महत्त्व देऊन मराठवाड्यात विविध ठिकाणी शाळा सुरू झाल्या. शैक्षणिक चळवळीच्या मदतीने राष्ट्र प्रेमाची जडणघडण करणे सुरू झाले. जे अखंड भारतासाठी महत्त्वाचे ठरले. स्वामी रामानंद तीर्थ यांनी शैक्षणिक चळवळीत आपले योगदान देण्यास सुरुवात केली. १९४७-४८ मध्ये संत साहित्याच्या अभ्यासासाठी शैक्षणिक संस्था सुरू केली होती. नांदेड मधील सर्व शैक्षणिक संस्था त्या काळात राष्ट्रप्रेमाणे भारलेल्या होत्या. विकास मंदिर वाचनालय, बंजारा होस्टेल, हुतात्मा पानसरे हायस्कूल धर्माबाद, चोखामेळा वसतीगृह,महिला समता परिषदेचे प्रौढ शिक्षणाचे कार्य, विवेकवर्धिनी मराठी शाळा (हैदराबाद ) कँधार, भोकर, खामगाव, बुलढाणा येथील शैक्षणिक संस्था या राष्ट्रभक्तीने भारलेल्या होत्या.

शिक्षण केवळ शिक्षण संस्थेमधून मिळते असे नाही तसेच वैचारिक समृद्धते सोबत शारीरिक सुदृढता ही महत्त्वाची असते. म्हणून नांदेड व मराठवाड्यात त्या काळात व्यायाम शाळा उघडण्यात आल्या. संगीत - चित्रकला विद्यालय, वाचनालय निर्माण करण्यात आली. सोबतच व्याख्यानमालांचे आयोजन, मासिके, वर्तमानपत्रे निर्माण झाली यातील अनेक जणांनी आजपर्यंत प्रामाणिकता, कर्तव्यनिष्ठा टिकवून ठेवली आहे. नांदेड येथील २१ जून १९४० ला स्थापन झालेली प्रतिभा निकेतन शैक्षणिक संस्था, इंद्रायणी बोधनकर यांनी सुरू केलेले बालक मंदिर, मराठवाडा महिला शिक्षण संस्था जी पुढे मराठवाडा महिला उद्योग या नावाने ओळखली जाऊ लागली यांनी जनसामान्यांसाठी कार्य केले.

मुक्ती संग्राम यशस्वी झाल्यानंतर मराठवाड्यामध्ये शिक्षणाच्या माध्यमातूनच खरा विकास घडवून आणता येऊ शकतो, याची जाणीव स्वामीजींना होती. म्हणून त्यांनी त्यादृष्टीने पावले उचलण्यास सुरुवात केली. २६ जून १९५० रोजी याचे फलित म्हणून नांदेड येथे पहिले पीपल्स कॉलेज उभारले गेले. या संस्थेत ज्ञान आणि चारित्र्याला प्राधान्य असेल तसेच हे एक लहानसे घरटे असेल. या घरट्यात पाखरे पिलांना ज्या मायेने अन्न भरवतात त्याच मायेने विद्यार्थ्यांना राष्ट्रप्रेम करण्यायोग्य ज्ञान दिले जाईल. परिपूर्ण माणूस उत्क्रांत करणे हे या संस्थेचे उद्दिष्ट असेल. विद्यार्थ्यांवर लोकशाही व धर्मनिरपेक्षतेचे संस्कार करून पुढील भारत घडवण्याचे कार्य येथे केले जाईल. या महाविद्यालयाच्या व्यवस्थापनासाठी नांदेड एज्युकेशन सोसायटीची स्थापना करण्यात आली. १९५३ साली या संस्थेअंतर्गत पीपल्स हायस्कूलची व १९६३ मध्ये विज्ञान महाविद्यालय सुरू करण्यात आले. आजचा विद्यार्थी पुढील काळातील भारताचा शिल्पकार आहे. त्या दृष्टिकोनातून चांगुलपणा, लोकशाही जोपासणारी पिढी शिक्षणसंस्थेच्या माध्यमातून निर्माण झाली पाहिजे, असे स्वामीजींना वाटे, त्यांच्याच विचारांचा आदर्श मानून सेवाधारी कार्यकर्त्यांची परंपरा येथे कायम आहे. मुक्ती संग्राम यशस्वी झाल्यानंतर मराठवाड्यामध्ये शिक्षणाच्या माध्यमातूनच खरा विकास घडवून आणता येऊ शकतो, याची जाणीव स्वामीजींना होती. म्हणून त्यांनी त्यादृष्टीने पावले उचलण्यास सुरुवात केली. मराठवाड्यातील पीपल्स कॉलेज म्हणजे स्वामी रामानंद तीर्थ यांचा आत्मा आहे. आजही नांदेड एज्युकेशन सोसायटी ही स्वामी रामानंद तीर्थ यांनी तयार केलेल्या घटनेप्रमाणे कार्य करते. धर्म हा हृदयाकडून हृदयाकडे जातो. स्वयंशासन महत्त्वाचे आहे. शुद्ध अंतकरण असलेल्या शिक्षक देशाला सामर्थ्य देऊ शकतो. जीवनाचे मूल्य बदलले की शिक्षणाची मूल्ये देखील बदलली पाहिजेत. राजकारणापासून अलिप्त राहून विद्यार्थ्यांनी बौद्धिक क्षमतेचा विकास करावा. अशा मौलिक विचारांना स्वामी रामानंद तीर्थ यांनी जीवनात आदर्श मानले. ब्रह्मचारीपणाचे स्तोम न दाखवता ब्रह्मचारी तत्व जाणूनही खरी आणि कठीण ब्रह्मचारी साधना करण्यात ते यशस्वी झाले. कुठल्याही सिद्धीचा वापर न करता, परमोच्च अवस्था जाणूनही सर्वसामान्य माणसांमध्ये सहजपणे वावरले. सदैव समाधी अवस्था जशी जाणली, तशीच योग्य सुदृढ नैतिक ममत्वतेचे जीवन जगणारा समाधीतच असतो या सत्यापर्यंत ते पोहचले होते. मन नाही- मन आहे अशा जाणीव ठेवणाऱ्या व्यक्तींसोबत राहूनही अहंकार विरहित योगी अत्यंत अवघड असणारी जीवनशैली सहजपणे त्यांनी अंगीकारली. कोणाचाही हेवा नाही, द्वेष नाही,आसक्ती नाही आणि विरक्तीही नाही अशा स्थितीत ते होते 'नैनं दहति पावकः' या जाणवेला ते पोहोचले होते. मूर्तिपूजा असावी की नसावी? यासंदर्भातील तत्त्वज्ञान त्यांनी चर्चेसाठी महत्त्वाचे मानले नाही. पिठापुरम येथे स्थापन केलेल्या शांती आश्रमाला स्वामीजी भेट देत असत. ओंकार स्वामी यांच्याशी त्यांचे सख्य होते. मानवतेच्या हितासाठी विज्ञान व अध्यात्म यांना एकत्र आणणे महत्त्वाचे आहे, हा हेतू समोर ठेवून शांती आश्रमामध्ये रामतीर्थ शांती महाविद्यालय २१ जानेवारी १९६६ रोजी ओंकार स्वामींच्या जन्मदिनी जयप्रकाश नारायण यांच्या हस्ते उद्घाटन करून सुरू करण्यात आले. हे महाविद्यालय दोन वर्षातच बंद पडले याच ठिकाणावरून पुढे खाली ग्राम उद्योगातील कार्यकर्त्यांसाठी उद्बोधन करणारे शिबिरे घेण्यात येऊ लागली. लालबहादूर शास्त्री व रामतीर्थ यांचा प्रभाव असणाऱ्या व्यक्तींची इच्छा होती की स्वामी रामतीर्थ यांचे एखादी स्मारक असावे यातूनच पुढे त्यासाठी प्रयत्न झाले १९६८ च्या जून महिन्यामध्ये ओंकार स्वामी यांच्या हस्ते पेरीयार गावाजवळील भागीरथी नदीच्या काठावर रामतीर्थांच्या स्मारकाचे अनावरण करण्यात आले. २३ सप्टेंबर १९५३ रोजी मराठवाडा विद्यापीठाची स्थापना छत्रपती संभाजीनगर येथे झाली. मराठवाड्यामध्ये विद्यापीठ व्हावे असे स्वामी रामानंद तीर्थ यांचे स्वप्न होते. त्यासाठी त्यांनी पाठपुरावा केला होता. या विद्यापीठाने स्वामीजींना विद्यापीठाच्या दशकपूर्ती सोहळ्याच्या निमित्ताने 'डॉक्टर ऑफ लॉज' ही पदवी दिली. यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते हा सन्मान त्यांनी स्विकारला. एकूणच स्वामी रामानंद तीर्थ यांचे जीवन चरित्र अभ्यासण्यावर लक्षात येते की, कर्मश्रेष्ठ असते या तत्त्वातून जीवन जगलेल्या या थोर महात्म्याने पीपल्स कॉलेजचे ब्रीद 'कर्माचे डोळे ज्ञान ते निर्दोष होआवे' असे सांगितले. याच तत्वाला महत्त्व देऊन प्रत्येकाने कार्य करावे हे अपेक्षित आहे.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर, भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# शालेय पोषण आहाराची देयके सहा महिन्यांपासून रखडली

## शिक्षण विभाग व आयुक्त कार्यालयातील समन्वयाचा अभाव

किनवट/प्रतिनिधी-तालुक्यातील शालेय पोषण आहाराची बिलं एप्रिल २०२६ पासून, म्हणजेच तब्बल सहा महिन्यांपासून थकीत असल्याने शाळा व्यवस्थापन आणि पोषण आहार कामगारांसमोर मोठे आर्थिक संकट उभे राहिले आहे. नांदेड जिल्हा परिषद शिक्षण विभागाचे एमडीएम विभाग आणि थेट पुणे आयुक्त कार्यालय यांच्यातील समन्वयाच्या अभावामुळे हा गोंधळ निर्माण झाला असून, पोटाला पिळ देऊन काम करणाऱ्या कामगारांची हक्काची देयके अडकून पडली आहेत.

शालेय विद्यार्थ्यांना नियमित व दर्जात्मक पोषण आहार मिळावा यासाठी स्वयंपाकी व मदतनीस अहोरात्र मेहनत घेतात. मात्र, गेल्या सहा महिन्यांपासून थकीत असलेल्या बिलांमुळे दैनंदिन भाजीपाला, इंधन व इतर साहित्याचा खर्च भागवणे कठीण झाले आहे. एकीकडे महागाई वाढलेली असताना दुसरीकडे हक्काचा मोबदला वेळेवर मिळत नसल्याने कामगारांवर उपासमारीची वेळ आली आहे. नांदेड जिल्हा परिषद प्रशासन आणि पुणे शिक्षण आयुक्त कार्यालयातील संथ कारभार व नियोजनाच्या अभावामुळेच ही परिस्थिती ओढावल्याचा आरोप केला जात आहे. प्राथमिक व माध्यमिक शिक्षण आयुक्तांसह शिक्षण सचिवालयाने या गंभीर बाबीकडे तातडीने लक्ष देऊन थकीत देयकांचा निधी त्वरित वितरित करावा, अशी जोरदार मागणी किनवट तालुक्यातील पोषण आहार कामगार व संबंधित घटकांकडून केली जात आहे. मागण्यांची दखल न घेतल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

# धर्माबाद तालुक्याला दुष्काळाची झळ;शेतमजुरांच्या हाताला काम मिळेना



## रोहीयोची कामे सुरु करण्याची मागणी

धर्माबाद/प्रतिनिधी-धर्माबाद तालुक्यात यंदा दुष्काळसदृश परिस्थितीमुळे शेती क्षेत्राला मोठा फटका बसला असून, ग्रामीण भागातील लाखो शेतमजुरांच्या हाताला काम नसल्याने उदरनिर्वाहाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. शेतीची कामे पूर्णपणे ठप्प झाल्यामुळे मजूर कुटुंबांवर उपासमारीची वेळ आली असून, शासनाने तातडीने रोजगार हमी योजनेची कामे सुरू करावीत, अशी मागणी आता तीव्र होऊ लागली आहे.

धर्माबाद तालुक्यातील ग्रामीण भागात बहुतांश कुटुंबांची उपजीविका ही केवळ शेतमजुरीवर अवलंबून आहे. एरवी पेरणी, निंदणी, खुरपणी, कापूस वेचणी आणि सोयाबीनसह इतर काढणीच्या हंगामात मजुरांना गावामध्येच हक्काचा रोजगार मिळायचा. मात्र यंदा लहरी हवामान, पावसाची ओढ आणि पिकांच्या झालेल्या नुकसानीमुळे शेतीची कामे कमालीची घटली आहेत. स्वतः शेतकरीच आर्थिक संकटात सापडल्याने मजुरांना रोजंदारी देणे त्यांना अशक्य झाले आहे.नियमित काम मिळत नसल्याने मजुरांच्या उत्पन्नाचा स्त्रोत पूर्णपणे बंद झाला आहे. दैनंदिन गरजा भागवणे, मुलांचे शिक्षण आणि औषधोपचाराचा खर्च कसा करावा या विवंचनेत मजूर कुटुंब आहेत. गावामध्ये पर्याय उपलब्ध नसल्याने अनेक कुटुंबांनी रोजगाराच्या शोधात शहरांकडे किंवा इतर तालुक्यांकडे स्थलांतर करण्यास सुरुवात केली आहे. यामुळे ग्रामीण भागातील गावे ओस पडण्याची भीती निर्माण झाली आहे.हंगामाच्या काळातही आमच्या हाताला काम नाही. घरात खाणारे तोंड जास्त आणि उत्पन्न शून्य, अशी आमची अवस्था झाली आहे. शासनाने शहरांकडे होणारे स्थलांतर थांबवण्यासाठी गावागावांत तात्काळ रोजगार हमीची कामे काढली पाहिजेत, अशी आर्त हाक स्थानिक मजुरांनी दिली आहे.आता या गंभीर परिस्थितीवर प्रशासन तात्काळ पावले उचलणार की मजुरांना वाऱ्यावर सोडणार, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# विधान परिषदेसाठी महायुतीतील जागा वाटपाचा तिढा सुटला

मुंबई/प्रतिनिधी-महाराष्ट्र विधान परिषदेच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीमधील जागावाटपाचा तिढा सुटला आहे. गेल्या काही दिवसांपासून अत्यंत प्रतिष्ठेच्या मानल्या जाणाऱ्या 'पुणे शिक्षक मतदारसंघा'वरून भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस या तिन्ही पक्षांमध्ये जोरदार रस्सीखेच सुरू होती. मात्र, वरिष्ठ पातळीवरील दीर्घ चर्चेनंतर पुणे शिक्षक मतदारसंघ अखेर भाजपच्याच वाट्याला देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय झाल्याची माहिती समोर आली आहे.

पुणे शिक्षक मतदारसंघाची जागा भाजपला मिळताच पक्षांतर्गत हालचालींना प्रचंड वेग आला आहे. भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन यांची भेट घेऊन तिन्ही मतदारसंघांतील उमेदवारांच्या नावाची यादी सुपूर्द केली आहे.भाजपने प्रत्येक जागेसाठी ५ संभाव्य उमेदवारांचे पर्याय ठेवले असून, ३ मतदारसंघांसाठी एकूण १५ नावं केंद्रीय नेतृत्वाकडे सोपवण्यात आली आहेत. यामध्ये पुण्याच्या जागेवरील प्रमुख दावेदारांचाही समावेश असून, केंद्रीय निवडणूक समितीकडून लवकरच अधिकृत उमेदवाराच्या नावावर अंतिम शिक्कामोर्तब केले जाणार आहे.पुणे शिक्षक मतदारसंघावर शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस या दोन्ही पक्षांतील अनेक स्थानिक इच्छुकांनी दावा ठोकला होता. आता ही जागा भाजपच्या खात्यात गेल्यामुळे मित्रपक्षांतील इच्छुकांमध्ये काही प्रमाणात नाराजी पाहायला मिळत आहे. मात्र, महायुतीचा धर्म पाळत शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमधील नाराज इच्छुकांची वरिष्ठांकडून समजूत काढली जाईल, असे भाजप नेत्यांकडून स्पष्ट करण्यात आले आहे.



शेवडी (बा) ता.लोहा येथील महेश महाविद्यालयातील विद्यार्थीनींना मानव विकास योजनेअंतर्गत सायकलचे वाटप करण्यात आले. यावेळी काँग्रेस कमिटीचे तालुकाध्यक्ष संजय भोसीकर, डॉ.यशवंत पाटील भोसीकर, मुख्याध्यापक दिलीप पाटील पवार, किशनराव वानखेडे, गंगाधर वानखेडे, चरणसिंह गव्हाणे व इतर उपस्थित होते. (छाया : विनोद महाबळे)

# पानसरे महाविद्यालयात पालक मेळावा उत्साहात संपन्न

नांदेड/प्रतिनिधी-पानसरे महाविद्यालयात गुरुवार, दि.१ ऑक्टोबर रोजी इयत्ता अकरावी आणि बारावी विद्यार्थ्यांच्या पालकांसाठी आयोजित करण्यात आलेला 'पालक मेळावा' मोठ्या उत्साहात व खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे सचिव सुभाषराव गायकवाड हे होते.

कार्यक्रमाची सुरुवात हैद्राबाद मुक्ती संग्रामातील थोर स्वातंत्र्य सेनानी हुतात्मा गोविंदराव पानसरे यांच्या प्रतिमा पूजनाने आणि मान्यवरांच्या तसेच उपस्थित पालकांच्या स्वागताने झाली. याप्रसंगी कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा.डॉ.शुध्दोधन गायकवाड यांनी आपल्या प्रास्ताविकातून या पालक मेळाव्याची भूमिका व मुख्य उद्दिष्टे अतिशय प्रभावीपणे मांडली. तसेच वर्षभरातील शैक्षणिक उपक्रमाचा आढावा घेत भविष्यातील कनिष्ठ महाविद्यालयाचे धोरणे यावर प्रकाश टाकला. उपस्थित पालकांना मार्गदर्शन महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.डॉ.महादेव बेलखेडे यांनी केले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महाविद्यालय सदैव प्रयत्नशील राहील अशी ग्वाही दिली. यावेळी मंचावर संस्थेचे संचालक मा.हा.पाटील माचनूरकर यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या उत्तरार्धात सर्व पालकांनी कनिष्ठ महाविद्यालयाच्या इमारतीला प्रत्यक्ष भेट देऊन आधुनिक वर्गखोल्या व अद्ययावत सुविधांची पाहणी केली. तसेच, विषय शिक्षकांशी थेट संवाद साधून आपल्या पाल्यांच्या शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेतला. याप्रसंगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी आणि पालकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

# कर्तव्यात कसूर केल्या प्रकरणी दोन पोलीस पाटील निलंबित

देगलूर/प्रतिनिधी- कर्तव्यात कसूर, वरिष्ठांशी गैरवर्तन करणे आणि अवैध धंद्याकडे दुर्लक्ष हे दोन पोलीस पाटलांना चांगलेच महागात पडले आहे.

पोलीस निरीक्षक सूर्यमोहन बोलमवाड यांच्या तक्रारीची दखल घेत, उपविभागीय अधिकारी अनुप पाटील यांनी दोन पोलीस पाटलांना तात्काळ निलंबित करण्याचे आदेश जारी केले आहेत. सुजायतपुरचे पोलीस पाटील बुद्धभूषण जाधव यांच्यावर शासकीय बैठकांना सातत्याने गैरहजर राहणे, शासकीय कामात निष्काळजीपणा दाखवणे आणि वरिष्ठांशी गैरवर्तन केल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. देगावचे पोलीस पाटील रवींद्र थडके यांच्यावर आपल्या हद्दीत सुरू असलेल्या अवैद्य मुरूम उत्खननाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करणे, कारवाईसाठी आलेल्या पोलीस पथकाला सहकार्य न करणे व उद्धट वर्तन करण्याचे आरोप सिद्ध झाले आहेत. या दोन्ही प्रकरणाची चौकशी केल्यानंतर आणि पुराव्यासह अहवाल सादर झाल्यानंतर उपविभागीय अधिकारी अनुप पाटील यांनी निलंबनाची कारवाई केली आहे.

# घोटी फाटा येथील जुगार अड्डयावर पोलीसांची धाड;चार जणांना अटक

## १.३७ लाखांचा ऐवज जप्त

नांदेड/प्रतिनिधी-किनवट तालुक्यातील घोटी फाटा जवळ सुरु असलेल्या जुगार अड्डयावर शुक्रवारी पोलीसाच्या पथकाने धाड टाकुन चार जणांना अटक केली. त्यांच्या जवळून १ लाख ३७ हजार रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला आहे.

घोटी फाटा ते मलकापूर खेरडा रस्त्यावरील एका शेतात जुगार अड्डा सुरु असल्याची माहिती पोलीसांना मिळाली. पोलीस अधीक्षक डॉ.नीलाभ रोहन यांच्या आदेशावरुन पोलीस निरीक्षक जगदीश मंडलवार यांच्या नेतृत्वाखाली पोलीस पथकाने शुक्रवारी घोटी फाटा ते मलकापूर रोडवरील एका शेतामध्ये सुरु असलेल्या जुगार अड्डयावर छापा टाकला. पैसे लावून तिर्रट नावाचा जुगार खेळत असतांना अभिजित उर्फ राजू राम कन्हाळे (वय ३८) रा.कमठाला, बालाजी गोविंद राठोड (वय ३६) रा.सरदारनगर, किनवट, मारोती पिराजी कदम (वय ३९) रा.घोटी, प्रभाकर गोविंद शिंदे (वय ३५) रा.लकडकोड यांना रंगेहाथ पकडले. पोलीसांनी त्यांच्या जवळून ४७ हजार ६०० रुपये रोख रक्कम, तीन मोबाईल, दोन दुचाकी व जुगाराचे साहित्य असा १ लाख ३७ हजार रुपयांचा ऐवज जप्त केला. याप्रकरणी चार जणांविरुध्द किनवट पोलीस ठाण्यात महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेत जि.प.हायस्कूल पार्डी-बोधडी खुर्दचा डंका

किनवट/प्रतिनिधी-नुकत्याच संपन्न झालेल्या तालुकास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेत जिल्हा परिषद हायस्कूल पार्डी-बोधडी खुर्दच्या विद्यार्थ्यांनी विविध खेळांमध्ये निर्विवाद वर्चस्व गाजवत ऐतिहासिक यश संपादन केले. क्रिकेट, बॅडमिंटन आणि कुस्ती या तीनही क्रीडा प्रकारांत प्रथम क्रमांक पटकावून ठस्सा उमटवला. या संघाला प्रोत्साहनार्थ किनवटच्या नगराध्यक्षा सौ.सुजाता एंड्रलवारांच्या हस्ते लेदरबॉलसाठी किट्सचे २ ऑक्टोबर रोजी वितरण करण्यात आले.

तालुकास्तरीय अंडर-१४ क्रिकेट स्पर्धेत पार्डी जिल्हा परिषद शाळेच्या क्रिकेट संघाने प्रतिस्पर्ध्यांवर मात करत थेट विजेतेपदावर नाव कोरले. दरम्यान विजेत्या क्रिकेट संघाकडे जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेसाठी आवश्यक असलेले लेदर किट उपलब्ध नसल्याची बाब कळताच क्रीडाप्रेमी करण एंड्रलवार यांनी या क्रिकेट संघासाठी २ किट्स उपलब्ध करून दिल्या. दरम्यान किनवट नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा सौ.सुजाता एंड्रलवार यांच्या हस्ते २ ऑक्टोबर रोजी विजेत्या क्रिकेट संघाला किट्स प्रदान करण्यात आल्या. आपला संघ निश्चितपणे जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत दमदार कामगिरी बजावून अव्वल स्थान प्राप्त करेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.कर्णधार आदित्य जाटवे व उपकर्णधार कुणाल मस्से यांच्या उत्कृष्ट नेतृत्वाखाली समाधान केंद्रे, शिवनाथ रणखांब, अजय कटारे, जयराज केंद्रे, हरी दयाळ, रुद्र भदाळे, दत्तात्रेय नभुरे, शिवम नोळे आणि सुरज ऐतनवाड यांनी अष्टपैलू कामगिरी करत शानदार विजय मिळविला. दरम्यान जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी पात्र ठरलेल्या क्रिकेट संघाकडे लेदरबॉलसाठी अत्यावश्यक किट उपलब्ध नव्हत्या. ती उणीव आता भरुन निघाली. याप्रसंगी रोहन एंड्रलवार, संतोष येलचलवार, डॉ.अमोल सूर्यवंशी, स्वीकृत नगरसेवक प्रशांत कोरडे आणि साई सिरमनवार आदी उपस्थित होते. पूर्वापार शैक्षणिक व क्रीडा परंपरेत नावाजलेल्या पार्डी-बोधडी खुर्द या शाळेतील विद्यार्थ्यांच्या यशामागे मुख्याध्यापक मोहन जाधव, क्रीडा प्रमुख सुशील कापसे, विनोद पांचाळ व खोकले यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. क्रीडा प्रमुख सुशील कापसे, राकेश गणोजवार, विनोद पांचाळ व मोहक पांचाळ, मडावी, मुंडे, कोंकेवाड, नालमवार, कांदे, डंगा, कांदे एन.व्ही.,गणोजवार, बालाजी कराड या शिक्षकांसह शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष व सदस्यांनी विजयी संघांचे कौतुक करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# गळफास घेवून शेतकऱ्याची आत्महत्या

नांदेड/प्रतिनिधी-शेतातील नापिकी व कर्जबाजारीपणाला कंटाळून एका शेतकऱ्याने आत्महत्या केल्याची घटना लोहा तालुक्यातील मौ.धनज बु.शिवारात घडली आहे.

किशन गंगाराम गवाले (वय ७२) रा.धनज बु. या शेतकऱ्याने शेतीसाठी बँकेचे कर्ज घेतले होते. नापिकीमुळे कर्जाची परतफेड करता आली नाही. दि.२ ऑक्टोबर रोजी सकाळी गळफास घेवून किशन गवाले यांनी आत्महत्या केली.

पान १ वरुन

## नांदेड व हिंगोली...

तत्काळ सुरक्षितरीत्या घराबाहेर पडून मोकळ्या जागेत थांबावे आणि प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे. दरम्यान, जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे हे परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवून असून त्यांनी जिल्हा प्रशासनाशी संपर्क साधून आवश्यक सूचना दिल्या आहेत. नांदेड जिल्ह्यात कोणतीही जीवित किंवा वित्तहानी झालेली नसून नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, घाबरून जाऊ नये आणि केवळ अधिकृत माहितीवरच विश्वास ठेवावा, असे आवाहन पालकमंत्री अतुल सावे यांनी केले आहे.

## पिके जळाली,विहिरींनी...

दरम्यान, सहाय्यक जिल्हाधिकारी बी. सरवनन यांनी उपस्थित महसूल व कृषी विभागाच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांना नुकसानग्रस्त भागातील पंचनामे अत्यंत गांभीर्याने आणि वस्तुनिष्ठ पद्धतीने करण्याचे निर्देश दिले. एकही पात्र शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घ्या, असे त्यांनी स्पष्ट केले. नुकसानीचे पंचनामे तातडीने पूर्ण करून सर्व गावांतील नुकसानीचा एकत्रित अहवाल शासनाकडे भरपाईसाठी पाठविण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.या पाहणी दौऱ्यात वाई सज्जाच्या मंडळ अधिकारी योगिता राठोड, तलाठी राम ठाकरे, पोलीस पाटील आशा बळीराम मोरे, तालुका कृषी अधिकारी वर्षा चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली कृषी सहाय्यक अजय सावळे यांच्यासह महसूल व कृषी विभागाचे अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. प्रशासनाने प्रत्यक्ष शेताच्या बांधावर येऊन परिस्थितीची पाहणी केल्याने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. मात्र, पाहणीपुरते आश्वासन न राहता पंचनामे पूर्ण करून शासनाकडून तातडीने मदतनिधीचे वाटप करावे, अशी अपेक्षा आता शेतकरी व्यक्त करीत आहेत.

# राज्य सेवा हक्क आयुक्त डॉ.किरण जाधव यांचा नांदेड दौरा

नांदेड/प्रतिनिधी-छत्रपती संभाजीनगर विभागाचे राज्य सेवा हक्क आयुक्त डॉ. किरण जाधव हे दि. १२ ते १३ ऑक्टोबर या कालावधीत नांदेड दौऱ्यावर येत आहेत.

सोमवार, दि. १२ ऑक्टोबर रोजी स.६ वा.रेल्वेने नांदेड येथे आगमन व शासकीय विश्रामगृह येथे राखीव. ११.३० वा. येथील जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्ह्यातील सर्व विभाग प्रमुख यांच्याकडून महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ च्या प्रभावी अंमलबजावणी संदर्भात आढावा घेतील. दुपारी ४ वा.तहसील कार्यालय माहूर येथे महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम १६(१)(ख) नुसार कार्यालयीन तपासणीस उपस्थिती व शासकीय विश्रामगृह माहूर येथे मुक्काम. मंगळवार, दि. १३ ऑक्टोबर रोजी सकाळी ८ वाजता हिंगोलीकडे प्रयाण करतील.

# पांदण रस्त्यावरच शाळेची तीन मजली इमारत;शेतकऱ्यांचा संताप

उमरखेड/प्रतिनिधी-ढाणकी रोडवरील हरदडा शिवारात शेतकऱ्यांच्या परंपरागत वहिवाटीच्या पांदण रस्त्यातच स्वामी विवेकानंद इंग्लिश मिडीयम स्कूलची तीन मजली भव्य वास्तू उभारण्यात आल्याचा गंभीर आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. अतिक्रमण हटवून रस्ता तात्काळ मोकळा करावा, या मागणीसाठी शेतकऱ्यांनी उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार यांना निवेदन दिले आहे.

उमरखेड ते ढाणकी रोडवरील हरदडा शिवारात उत्तरेकडे कालेजी महाराज संस्थानकडे जाणारा ४० फूट रुंदीचा परंपरागत पांदण रस्ता आहे. या रस्त्याची महसूल दप्तरी अधिकृत नोंद असून, हा रस्ता परिसरातील १० ते १२ शेतकऱ्यांच्या शेतात जाण्या-येण्यासाठी आणि शेतमालाच्या वाहतुकीसाठी एकमेव मार्ग आहे. मात्र याच रस्त्यावर स्वामी विवेकानंद इंग्लिश मिडीयम स्कूलची तीन मजली भव्य इमारत उभारण्यात आल्याने शेतकऱ्यांची प्रचंड गैरसोय होत आहे. शेतात जाणे-येणे बंद झाल्याने शेती कामांवर परिणाम होत असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. या अतिक्रमणाचा अडथळा तात्काळ दूर करून परंपरागत पांदण रस्ता खुला करून द्यावा, या मागणीसाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे यवतमाळ जिल्हाध्यक्ष रविंद्र जैन यांच्या नेतृत्वात अर्चना बाळासाहेब सरसमकर, अर्चना उत्तमराव वानखेडे, आशिष वानखेडे, भारत मेंडके, देवानंद चव्हाण, श्रीपाल संचेती, भारती संचेती, इंदरचंद जैन, किरण जैन, श्वेता जैन, विनायक वानखेडे आदी शेतकऱ्यांनी उपविभागीय अधिकारी व तहसीलदार, उमरखेड यांच्याकडे निवेदन सादर केले आहे.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग अँण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४